**नियमीत दिवाणी मुकदमा नं. ०१/२०१८ मधील निशाण नं. ५ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिताचे कलम ३९(१) खाली दाखल करण्यात आला आहे.

**अर्जदाराची बाजू थोडक्यात खालील प्रमाणे.**

२. सर्व्हे नंबर ६२१ हिस्सा नं. ८ क्षेत्र २.८ गुंठे ही दावा मिळकत आहे. वादी हिचे वडिलांचे नावे सदरची दावा मिळकत ७/१२ सदरी नोंद आहे. तिच्या मते ती जागा घरभाट मिळकत आहे. वादीचे दावा मिळकतीमध्ये घर आहे. दावा मिळकतीशी प्रतिवादीचा कोणताही संबंध नाही. वादी ही मुंबईला राहायला असते. सदर दावा मिळकतीमध्ये इतर देखील सहभागदार आहेत. मात्र, ते देखील त्या जागेमध्ये राहात नाहीत. अशा परिस्थितीत वादीला दावा मिळकतीकरीता नियमीत लक्ष देता येत नाही. प्रतिवादी याने दिनांक ४/२/२०१८ व ५/१/२०१८ रोजी उरुस हा धार्मिक कार्यक्रम दावा मिळकतीमध्ये साजरा करण्याचे निश्चीत केले आहे. सदरील उत्वस साजरा करण्यासाठी प्रतिवादी याने वादीची कोणतीही परवानगी घेतलेली नाही. सदर उत्सवच्या वेळेस मोठया प्रमाणात बकरे कापले जाणार आहेत आणि ती गोष्ट वादीस पसंत नाही. सबब वादीच्या मते प्रतिवादी याने दावा मिळकतीमध्ये उरुस करण्यापूर्वी तिची संमत्ती घेणे आवश्यक होते. ज्याअर्थी तिची परवानगी घेतली नाही त्याअर्थी प्रतिवादीनी दावा मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचा धार्मिक उत्सव दिनांक ४ जानेवारी व ५ जानेवारी २०१८ रोजी किंवा तद्नंतर साजरा करु नये अशी तुर्तातुर्त ताकिद मागितली आहे.

३. या अर्जास प्रतिवादी याने आपले म्हणणे मांडलेले असून त्याने वादीचे अर्जाला कडाडून विरोध केलेला आहे. त्यांच्या मते दावा मिळकतीस सातबाराला वादीचे वडिलांचे नाव हे ५ आणे ४ पै च्या हिश्श्याप्रमाणे नमुद आहे. उर्वरीत १० आणे ८ पै जमिन ही खानोलकर कुटुंबियांच्या मालकीची आहे. त्याचेबाबत प्रसाद वसंत खानोलकर याने प्रतिवादी याना उरुस साजरा करण्यासाठी दिनांक २९/१/२०१६ रोजी संमत्तीपत्र लिहून दिलेले आहे. दावा मिळकतीमध्ये एकच इमारत असुन ती इमारत सिद्दी सरवर बाबांचा दर्गा आहे. त्या व्यतिरिक्त दावा मिळकतीमध्ये कोणतीही इमारत नाही. सदर दर्ग्याची नोंद नगर परिषद घर क्र. १४९ म्हणून नोंद आहे. प्रतिवादी ट्रस्ट ही सदर सिद्दी दर्गा बाबत त्यांचे घटनेप्रमाणे व नियमाप्रमाणे सदर दर्ग्याचे व्यवहार पाहते. त्यांचे मते नाजीर अब्दुल शेख यांचे सांगण्यावरुन वादीने प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. सदर नजीर शेख याने

सदर दर्ग्याबाबत २०१५ साली वाद केल्यामुळे कॅव्हेट देखील दाखल केले होते.

४. सदर दर्ग्यामध्ये प्रतिवादी ट्रस्टच्या नावे विजेचे कनेक्शन देखील घेण्यात आले आहे. त्यांच्या मते सदरचा उरुस हा २ दिवस चालणारा कार्यक्रम असुन त्या दोन्ही दिवसात दर्ग्यात किंवा दावा मिळकतीमध्ये बकरे कापले जात नाही. मात्र तेथे बाहेरुन आणलेल्या कच्च्या मटणाचा प्रसाद केला जातो आणि त्याचा आस्वाद सर्व जातीय धर्माचे लोक घेतात. तसेच दावा मिळकतीच्या बाजुला ब्राम्हणाचे देवस्थान असल्यामुळे देखील तेथे बकरे कापले जात नाही. त्यांच्या मते सदर उरुसाच्या दरम्यान विविध कार्यक्रम घेतले जातात. आणि त्याबाबतची परवानगी देखील नगरपरिषदे कडून आणि पोलीसांकडून घेतला जाते. सबब उरुस घेण्यास प्रतिबंध केल्यास सिद्दी सर्वर बाबा यांना मानना—या समस्त मुस्लीम समाजाच्या भावना दुखावल्या जातील आणि प्रतिवादीच्या कायदेशीर हक्कास देखील बाधा येईल असे प्रतिवादीचे म्हणणे आहे. वादीने दर्ग्याबाबतची वस्तुस्थिती लपवुन ठेवलेली आहे. तसेच आपल्या मालकीच्या घरात असलेले भाडेकरु नाजीर शेख यांचे बदसल्ल्याने हा दावा दाखल केला आहे असे त्यांचे मत आहे. दावा मिळकतीतील झाडे सुध्दा ट्रस्टच्या उठवणीतील आहेत असे त्याचे म्हणणे आहे. न्यायाचा समतोल प्रतिवादीच्या बाजुने झुकला असल्यामुळे तुर्तातुर्त ताकिद देवू नये अशी प्रतिवादीची मागणी आहे.

५. या सर्व प्ररिस्थितीतून माझे समक्ष खालील मुद्दे निर्माण होतात. त्यावरील मी माझे निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | सकृतदर्शनी दावा वादी हिचे लाभात आहे का? | :— नकारार्थी |
| २ | न्यायाचे समतोलत्व मनाई देण्याच्या बाजुने झुकत आहे का? | :— नकारार्थी |
| ३ | मागणीप्रमाणे तुर्तातुर्त ताकीद न दिलेस वादी हिचे अपरिमित असे नुकसान होणार आहे का? | :— नकारार्थी |
| ४ | आदेश काय? | :—येणेप्रमाणे |

## **का र ण मि मां सा**

**मुद्दा क्र.१ ते ३** :—

६. दोन्ही पक्षकारांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचे

अवलोकन केले. या क्षणी महत्वाची बाब म्हणजे प्रतिवादी यांनी या न्यायालयाचे अधिकारक्षेत्राबाबत हरकत घेतली असल्यामुळे तुर्तातुर्त मनाई अर्ज अंतिमरित्या निकाली काढणे शक्य नाही. दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ९अ प्रमाणे जेव्हा न्यायाचे अधिकार क्षमते बाबत हरकत घेतली जाते तेव्हा प्रथमत: न्यायालयाला अधिकार आहे की नाही हा मुद्दा ठरविणे आवश्यक आहे. त्याकरीता या दाव्यामध्ये निशाण १० वर आदेश करुन तसा मुद्दा काढावा असा स्वतंत्र आदेश करणयात आलेला आहे. सबब दिवाणी प्रक्रिया संहिताचे कलम ९अ(२) अन्वये तुर्तातुर्त मनाई आदेशावरती अधिकार क्षेत्राबाबतचा मुद्दा निश्चीत होण्यापर्यंत आदेश केला जावू शकतो आणि त्याप्रमाणे मी प्रस्तुतचा आदेश करीत आहे.

७. या कामी वादीतर्फे केवळ दावा मिळकतीचा ७/१२ हजर करण्यात आला आहे. उलटपक्षी प्रतिवादी याच्या तर्फे बरीच कागदपत्रे हजर करण्यात आली असुन त्यामध्ये नगरपरिषदेकडे सिध्दी साहेब देऊळ या नावाने दावा मिळकतीमध्ये नमुद केलेला दर्ग्याची नोंद आहे असे दिसते. तसेच कराचे पावतीवरुन देखील सदर दर्ग्याची नोंद नगरपरिषदेकडे आहे असे दिसते. त्याचप्रमाणे नाजीर अब्दुल शेख याने दाखल केलेल्या कॅव्हेट अर्जामध्ये देखील दावा मिळकतीमध्ये दर्गा आहे असे दिसते. विज बिलावरुन देखील प्रतिवादी संस्थेच्या नावे विज जोडणी देण्यात आली आहे असे दिसते. मुख्याधिकारी नगरपरिषद वेंगुर्ला आणि पोलीस निरीक्षक वेंगुर्ला यांना केलेल्या अर्जावरुन देखील दावा मिळकतीमध्ये दर्गा असल्याचे दिसते. सदर दर्ग्याबाबतचा फोटो देखील दाव्याचे कामी सादर करण्यात आले आहेत. सबब दावा मिळकतीमध्ये दर्गा अस्तित्वात आहे ते प्रथमदर्शत: दिसत आहे. प्रतिवादी याने सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये त्यांचे संस्थेच्या घटनेची प्रत देखील हजर केलेली आहे. त्या घटनेच्या प्रतिचे अवलोकन केला असता धार्मिक कार्यक्रम घेणे हा त्यांचा उपक्रम आहे असे दिसते. तसेच महत्वाचे म्हणजे दावा मिळकतीपैकी असलेले एक सहभागदार प्रसाद खानोलकर यांनी दावा मिळकीमध्ये उरुस करण्याकरीता संमत्ती दिल्याचे देखील प्रतित होते. एकंदरीत या सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसते की प्रतिवादी संस्था आणि दावा मिळकतीतील दर्गा हा बर—याच वर्षापासून दावा मिळकतीमध्ये अस्तित्वात आहे आणि त्याबाबतचा कार्यक्रम प्रतिवादी संस्था वेळोवेळी घेत आलेली आहे.

८. दावा मिळकतीच्या सातबाराचे अवलोकन केले असता वादी हिचे वडिलांच्या नावे त्या मिळकतीमध्ये असणारा हिस्सा हा केवळ ५ आणे ४ पै इतका दिसतो. एकंदरीत दावा मिळकतीचे एकूण क्षेत्र पाहिले असता सदरची जागा फार मोठी आहे असे म्हणता

येणार नाही. त्या जागेमध्ये वाटप झाले आहे अशी देखील परिस्थिती नाही. या परिस्थितीत एका सहभागदाराने प्रतिवादी यांना संमत्ती देखील दिलेली आहे. वादीने नमुद केल्याप्रमाणे दावा मिळकतीमध्ये घराचे अस्तित्व आहे असे सांगण्यासाठी कोणताही प्रथमदर्शी पुरावा वादीने सादर केलेला नाही. वादीच्या म्हणण्यावरुन असे दिसते की वादी ही मुंबई येथे रहावयास असते त्यामुळे दावा मिळकतीच्या येथे नेमके काय चालते याची तिला कल्पना नाही. उलटपक्षी प्रतिवादी याने त्याचे म्हणण्यास अनसरुन अजगरअली अब्दलु लतीफ शेख, पीटर लुईस म्हापसेकर, मोहन वेंगुर्लेकर या व्यक्तींचे प्रतिज्ञापत्र जोडलेली आहेत. या प्रतिज्ञापत्रामुळे या गोष्टीस दुजोरा मिळतो की दावा मिळकतीमध्ये सिद्दी सरवर दर्ग्याची इमारत उभी आहे आणि बरेच वर्षापासून तेथे उरुस हा उत्सव साजरा केला जातो. त्या उत्सवा दरम्यान तेथे बकरे कापले जात नाहीत. सबब या महत्वाच्या गोष्टी एकतर वादीने न्यायालयापुढे लपवल्या आहेत किंवा वादीला त्याबाबत कल्पना नाही.

सबब ज्याअर्थी ब—याच कालावधीपासून दावा मिळकतीच्या येथे दर्ग्याचे अस्तित्व आहे आणि तेथे उरुस साजरा केला जातो, त्याअर्थी न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने आहे आणि तिने प्रथमदर्शत: तिचे अधिकाराला बाधा येईल अशी स्थिती उभी केली आहे असे मला वाटत नाही. उलटपक्षी वादी हिचा सदर दावा मिळकतीमधील प्रथमदर्शत: दिसणारा हक्क देखील फार कमी जागेपुरता मर्यादीत आहे. सबब वादीने स्पष्टपणे दावा मिळकतीची विस्तृत माहिती न दिल्यामुळे तिचे ताब्यातील जागेमध्ये तिला असलेल्या अधिकारावर काही बाधा येते किंवा कसे हे ठरविणे शक्य नाही. त्यामुळे प्रथमदर्शी बाजु वादीने प्रस्तापित केली आहे असे मला वाटते. त्याचप्रमाणे तुर्तातुर्त मनाई दिल्यास वादी हिचे अपरिमीत नुकसान होईल असे मला वाटते. कारण उरुसच्या अवघ्या एक दिवस पूर्वी प्रस्तुतचा दावा दाखल करण्यात आला. सदर उरुसाला बरेच लोक सहभागी होणार आहेत असे दिसते त्यामुळे अशा अंतिम क्षणाला तुर्तातुर्त आदेश देवून प्रतिवादी याना मनाई दयावी असे मला वाटत नाही. सबब वादी हीचे जर काही नुकसान झाले तर त्याची भरपाई वादी हिला मिळणार नाही. उलटपक्षी प्रतिवादी अगर त्या संस्थेशी जोडलेल्या अगर दर्ग्यावरती आस्था असणा—या लोकांचे होणारे मानसिक नुकसान हे अपरिमित आहे. सबब या क्षणाला तुर्तातुर्त ताकिद देणे मला योग्य वाटत नाही. म्हणून मी खालील आदेश पारित करतो.

**अधिकार क्षेत्राचा मुद्दा निश्चीत होण्यापर्यंत वादीला तुर्तातुर्त ताकिद देता येणार नाही.**

सही/—

(वि.द.पाटील)

दिनांक— ०४/०१/२०१८ दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.